# घराणे क्रमांक १७ पंचनदी-वाकरुळ-इंदूर

या घराण्याचा ज्ञात मूळ पुरुष हरि. हे घराणे मूळचे पंचनदीचे. तेथून नागांव, वाकरुळ, पेण, सुरत, इंदूर, उज्जयिनी या ठिकाणी यांचे पूर्वी वास्तव्य झाले आहे. यांतील हरि गोपाळ (४), यांची भार्या सरस्वतीबाई या इंदूरास राहात होत्या. आणि यांचे पुत्र महादेव हरि (५) कोठे आहेत ज्ञात नाही.

**कुलस्वामी -** या घराण्याचा कुलस्वामी कोळथऱ्याचा कोळेश्वर. याचे जोडीस योगेश्वरी कुलस्वामिनी मानितात.

**कुलधर्म -** देवदिवाळीस कोळेश्वर, योगेश्वरी, सत्येश्वर इत्यादि पांच देवतांस नैवेद्य असतात.

कुलाचाराबद्दल काही माहिती मिळाली नाही. या घराण्यास वतन नाही. या घराण्यांत पिढी ५, एकूण व्यक्ती ११

१ हरि (१) कोंकणांतून इंदुरास गेले नि तेथे स्थायिक झाले. तेथे सावकारी करीत. सरदार बुळे यांचे शेजारी यांचा वाडा होता. भार्या गंगा.

२ रामराव हरि (२) मृ. ७५ व्या वर्षी. इंदुरास सावकारी करीत. भार्या जानकी.

३ गोपाळ रामराव हरि - मृत्यु वयाचे ८० वे वर्षी हे मोडक (१६/७) घराण्यातून दत्तक आले. पूर्वीचे नांव पुरुषोत्तम रामचंद्र, हे इंदुरास सावकारी करीत. भार्या राधा. (कु. धोंडू पिता गणपतराव जोशी रा. चिखलदा, इंदुर) अपत्ये २ कन्या ३ पुत्र.

४ कु. कुसा गोपाळ रामराव - (रखमा) भ्र. गणपतराव जोशी. रेल्वे स्टेशन मास्तर रा. जुन्नर.

४ कु. गंगू गोपाळ रामराव - (जानकी) भ्र. सितारामपंत खाडिलकर. रा. इंदूर

४ हरि गोपाळ रामराव - ज. स. सुमारे १८६०. मृ.स. १९२१. इंदुरास सावकारी करीत. भार्या सरस्वती (मनकर्णीका पिता मोरेश्वर बाळकृष्ण जोशी-काणे रा. सुरत) ज.स.सु. १८६८. वास्तव्य गोंदवलेकरांचे राममंदिर, शनी गल्ली, इंदुर. अपत्ये २ कन्या ५ पुत्र.

५ चंद्रभागा हरि गोपाळ - (जानकी) भ्र. रघुनाथ बळवंत वैशंपायन रा. इंदुर.

५ गोदावजी हरि गोपाळ - (उमा) भ्र. दत्तोपंत फडके रा. इंदुर.

५ लक्ष्मण हरि गोपाळ - ज.स. १८७९. मृ.स. १९३४. इंदुरास सरकारी नोकरी होती. भार्या अन्नपूर्णा (बाळी) यांना १० अपत्ये झाली सर्व अल्पवयात मृत्यु पावली.

५ शिवराम हरि गोपाळ - ज.स. १८९१. मृ.स. १९१३. इंदुरास खासगी नोकरी होती. भार्या गीता (कु. गंगु पिता केतकर रा. मुंबई.)

५ आत्माराम हरि गोपाळ - मृत्यु वयाचे १५ वे वर्षी इंदुर येथे.

५ गणेश हरि गोपाळ - उपनयनानंतर मृत्यु.

५ महादेव हरि गोपाळ - ज.स.सु. १९१०. उपनयनानंतर घर सोडून गेले.

४ खंडेराव गोपाळ रामराव - मृत्यु वयाचे ४५ वे वर्षी. बालपणापासून परमार्थाकडे प्रवृत्ती. कच्छ, भुज, द्वारका या भागात महंत म्हणून वावर. काश्मिर संस्थानात श्रीनगर समीप एका देवीत देवळात अखेर.

४ रामचंद्र गोपाळ रामराव - मृत्यु वयाचे ३० वे वर्षी. इंदुरास सरकारी नोकरी होती. भार्या सीता. (कु. येसू पिता शिदोरे रा. देवास मोठी पाती).